| महाराष्ट्र पोलीस | रावेर पोलीस स्टेशन<br>फोन नंबर ०२५८४-२५०३३३<br>Email Id :- raverpi2@gmail.com | |
|---|---|---|
| रावेर पोलीस स्टेशन | जावक क्रमांक - /२०२५ | दिनांक :- ०९/१०/२०२५ |

## प्रेस नोट

**मा.संपादक सो.**

------------

# रावेर पोलीस स्टेशन गुन्हे शोध पथकाने दोन एकरातील 171 किलो वजनाची गांजाची शेती उध्दवस्त केली

रावेर पोलीस स्टेशनचे पो.नि. डाँ विशाल जयस्वाल यांना दिनांक-09/10/2025 रोजी मिळालेल्या गुप्त माहीतीच्या आधारे सकाळी रावेर पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार तसेच फाँरेन्सीक पथक यांनी मोरव्हाल ता.रावेर शिवारातील शेतात आरोपी नामे युसुफ अकबर तडवी वय-50, रा. मोरव्हाल ता.रावेर याचे शेतात जावुन छापा टाकला. सदर आरोपीने त्याचे दोन एकर शेतात तुरीचे पिकाचे मधोमध स्वतहाच्या आर्थिक फायद्यासाठी मानवी मेंदुवर विपरीत परिणाम करणारी कँनबिस वनस्पती (गांजा) सदृश अंमली पदार्थाचे एकुन 171 वजनाची एकुन 172 लहान मोठी झाडांची लागवड करुन जोपासना केलेली आढळुन आल्याने पंचासमक्ष पोलीसांनी व फाँरेन्सीक पथक यांनी पंचनामा करुन मुद्देमाल जागीच जप्त केला आहे. जप्त केलेल्या मुद्देमालाचे बाजारभावाप्रमाणे अंदाजीत मुल्य 17,00,000/-(सतरा लाख रुपये) इतके आहे.

सदरचे शेत हे अति दुर्गम भागात असल्याने गुन्हे शोध पथकाने जवळपास 3 किलो मीटर परीसर सकाळी 08.00 वाजेपासुन पिंजुन काढत मिळालेल्या बातमीची खातरजमा करुन कारवाई केली आहे. तसेच सदर आरोपीवर एन.डी.पी.एस.अँक्टनुसार गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कारवाई ही मा. डाँ महेश्वर रेड्डी सो पोलीस अधिक्षक जळगाव , मा. श्री अशोक नखाते सो अप्पर पो.अधिक्षक जळगांव विभाग, मा. श्री अनिल बडगुजर सो पोलीस अधिक्षक फैजपुर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रावेर माधील पो.नि डाँ विशाल जयस्वाल, पोउपनिरी तुषार पाटील, पोउपनिरी मनोज महाजन,गुन्हे शोध पथकातील पोना कल्पेश आमोदकर , पोकाँ प्रमोद पाटील, विशाल पाटील, श्रीकांत चव्हाण,भुषण सपकाळे, राहुल परदेशी, योगेश पाटील पाल दुरक्षेत्रचे पोहेकाँ ईश्वर चव्हाण, पोहेकाँ जगदीश पाटील, पोकाँ ईस्माईल तडवी, पोकाँ गजाजन बोणे, कुंदन नागमल चालक पोहेकाँ गोपाळ पाटील अशांनी केली आहे.

s/d

(डॉ. विशाल जयस्वाल)
पोलिस निरीक्षक
रावेर पोलिस स्टेशन


Galaxy S24 Ultra


Galaxy S24 Ultra